आकाशवाणी पुणे
प्रादेशिक वृत्त विभाग
पुणे वृत्तांत
वेळ-संध्याकाळी 06.00 वा.

दिनांक : 04.11.2026 वार : बुधवार

मुख्यमंत्री चाकण

महाराष्ट्राला केवळ देशाचे वाहन उत्पादन केंद्र न ठेवता भविष्यातील मोबिलिटी क्षेत्रातील जागतिक केंद्र बनविण्याचे राज्य शासनाचे उद्दिष्ट आहे. 'मेक इन महाराष्ट्र'पासून 'इनोव्हेट इन महाराष्ट्र'पर्यंतची वाटचाल करताना उत्पादनासोबत संशोधन, अभियांत्रिकी, तंत्रज्ञान विकास आणि नवकल्पनांना प्रोत्साहन दिले जात असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

चाकण इथं मर्सिडीज-बेंझच्या अत्याधुनिक इलेक्ट्रिक जीएलसी वाहनाच्या लोकार्पण प्रसंगी ते बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, मर्सिडीज-बेंझ ग्रुपचे तसंच प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

शेतकरी कर्जमुक्ती

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजने अंतर्गत आज ४.८७ लाख पात्र शेतकरी लाभार्थ्यांच्या खात्यात ४ हजार ७६५ कोटी रुपयांची कर्जमुक्तीची रक्कम जमा करण्यात येत आहे. यामध्ये पुणे जिल्ह्यातील १२ हजार ८८६ शेतकऱ्यांना जवळपास ७९ कोटी रुपयांचा लाभ मिळाला आहे.

पात्र शेतकरी लाभार्थी आणि त्यांना मिळणाऱ्या लाभाच्या रकमेची विभाग आणि जिल्हानिहाय चौकशी यादी आज प्रसिद्ध करण्यात आली आहे.

योजनेची अंमलबजावणी ऑनलाइन संगणकीय प्रणालीद्वारे करण्यात येत आहे.

म्हाडा सोडत

म्हाडाच्या पुणे मंडळातर्फे जाहीर करण्यात आलेल्या ४ हजार ४६२ सदनिकांच्या सोडतीला नागरिकांचा विक्रमी प्रतिसाद मिळाला आहे. या सोडतीसाठी एकंदर २ लाख ७३ हजार ९७४ अर्जदारांनी अर्ज केले असून ही म्हाडाच्या इतिहासातील आतापर्यंतची ही विक्रमी अर्जसंख्या ठरली आहे. डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात सदनिकांची सोडत काढली जाणार असून, यशस्वी अर्जदारांची नावे त्याच दिवशी प्रसिद्ध केली जाणार आहेत.

शरदपवारांना डिस्चार्ज

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांना आज पुण्यातील रुबी हॉल क्लिनिकमधून उपचारांनंतर डिस्चार्ज देण्यात आला. त्यांची प्रकृती स्थिर असून, प्रकृतीत सुधारणा झाल्याची माहिती रुग्णालय प्रशासनानं दिली. डिस्चार्जनंतर ते मुंबईतील निवासस्थानी रवाना होणार आहेत.

बेकायदा फटका स्टॉल

शहरातील बेकायदा फटाका स्टॉलवर कारवाई करण्याचे पत्र पुणे महापालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन विभागानं अतिक्रमण नियंत्रण विभागाला दिलं आहे. गर्दीच्या ठिकाणी आणि बाजारपेठांमधील स्टॉलमुळे दुर्घटनेचा धोका असल्याने परवानगीशिवाय उभारलेल्या स्टॉल्सवर कारवाई करण्याचे निर्देश अतिक्रमण नियंत्रण विभागाला दिले असलयाची माहिती उपायुक्त सोमनाथ बनकर यांनी दिली.

फडके जयंती

आद्य क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके यांच्या १८१ व्या जयंतीनिमित्त पुण्यातील संगमवाडी येथील त्यांच्या स्मारकाला आज पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. फडके स्नेहवर्धिनी आणि रेल्वे पोलीस विभागाच्या वतीने या कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. इंग्रजांच्या राजवटीविरुद्ध सशस्त्र लढा उभारणाऱ्या फडके यांच्या विचारांतून प्रेरणा घेऊन तरुणांनी देशासाठी कार्य करावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

कॉल सेंटर

महाराष्ट्र शासनाच्या बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय आणि ग्रामीण परिवर्तन अर्थात स्मार्ट प्रकल्पांतर्गत राज्याच्या कृषी पणन संचालनालयाच्यावतीने शेतकरी, व्यापारी आणि कृषी पणन क्षेत्रातील संबंधित घटकांसाठी माहिती आणि तक्रार निवारण कॉल सेंटर सुरू करण्यात आले आहे. या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन पणन संचालक तथा स्मार्ट प्रकल्प अंमलबजावणी प्रमुख संजय कदम यांनी केले आहे.

या कॉल सेंटरचा विनाशुल्क टोल फ्री क्रमांक १८००-२१०-११७७ असून संबंधित घटकांना सोमवार ते शनिवार या दिवशी सकाळी ९ ते सायंकाळी साडेसहा या वेळेत या क्रमांकावर संपर्क साधता येईल.

स्वच्छ, सुंदर, शून्य कचरा शाळा

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या थेरगाव इथल्या यशवंतराव चव्हाण प्राथमिक शाळेत आज महापालिकेचे आयुक्त डॉक्टर विजय सूर्यवंशी यांच्या हस्ते 'स्वच्छ, सुंदर, शून्य कचरा शाळा' प्रकल्पाचे उद्घाटन करण्यात आलं. हा उपक्रम शहराला शून्य कचऱ्याच्या दिशेने नेणारं महत्वाचं पाऊल ठरेल असा विश्वास डॉक्टर सूर्यवंशी यांनी यावेळी बोलताना व्यक्त केला. शून्य कचरा प्रभाग ते संपूर्ण शहर कचरामुक्त करण्याच्या दिशेने हा उपक्रम महत्वाचा आहे असंही ते म्हणाले.

बालसंसद

राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाने यशदा आणि युनिसेफ यांच्या सहयोगानं येत्या २० नोव्हेंबरला पुण्यामध्ये 'महाराष्ट्र बाल संसद २०२६' चे आयोजन केले आहे. पुण्यात होणाऱ्या या बाल संसदेत ३४ जिल्ह्यांतील १०० हून अधिक बालप्रतिनिधी सहभागी होणार असल्याची माहिती राज्य बाल हक्क आणि संरक्षण आयोगाच्या सदस्य सचिव वंदना जैन यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे. बालकांचा निर्णयप्रक्रियेतील सहभाग वाढविणे, त्यांच्यात नेतृत्वगुण आणि लोकशाही मूल्ये रुजविणे तसेच विकसित महाराष्ट्राच्या उभारणीत त्यांच्या विचारांचा, अपेक्षांचा आणि सूचनांचा समावेश करणे या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

हवामान

पुणे आणि शहर परिसरात आज आकाश अंशतः ढगाळ राहण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. कमाल तापमान 32 तर किमान तापमान 19 पुर्णांक 7 अंश सेल्सियस नोंदवण्यात आलं. उद्या देखील अशाच प्रकारचं हवामान राहण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू, विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.